शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
17 सितम्बर 2018
पीअर रीव्यूड रेफ़्रीड रिसर्च जर्नल

# भारतीय संस्कृत शोकनाट्याचा जनक : नाटककार भास

राहुल राम हळदे (शोधार्थी)
डॉ.शशिकांत ब-हानपुरकर (मार्गदर्शक)
दिलीप चव्हाण (निर्देशक)
भाषा व साहित्य विभाग
स्वामी रामानंदतिर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड, महाराष्ट्र, भारत

## प्रस्तावना

आपल्या लेखन तंत्राच्या व लेखन स्वतंत्रतेच्या तसेच कथानक, विषयाची व्यापकता याच्या जोरावर एक प्रतिभा संपन्न नाटककार भारतीय नाट्य-सृष्टीस मिळाला, ह्या नाटककाराने भरतनाट्यशास्त्राचे नियम झुगारून लावले। तसेच त्यांच्या लेखणीतून संस्कृत नाट्य-परंपरेत प्रथमताच ‘उरुभंग’ शोकांतिकेचा जन्म झाला, तो महान नाटककार म्हणजे महाकवी भास।

नाटककार भास हा संस्कृत नाट्य परंपरेचा महान सुपरिचित असा आद्य नाटककार आहे। त्याच्या अनेक नाट्य-कृती व त्याच्या विषयी काढलेले प्रसंशात्मक संदर्भ वेगवेगळ्या इतिहासिक व संस्कृत वाड्मयात आढळतात। 19 व्या शतकापर्यंत ह्या नाटककाराचा फक्त उल्लेख मिळत होता। परंतु त्याची रचना याविषय फक्त पुसट असा उल्लेख मिळत होता, तसेच त्यांच्या विषयी संपूर्ण अशी माहिती उपलब्ध नव्हती।

1909 मध्ये टी।गणपती शास्त्री ह्यांना केरळ मधील ‘त्रावणकोर’ येथील राजमहालातील पुस्तक संग्रहालयात, 105 ताडपत्र्यांवर मल्याळी भाषेच्या 300 ते 400 वर्ष जुन्या पाण्डूलिपी मिळाल्या। टी.गणपती शास्त्री ह्यांनी त्याचे संकलन व अध्ययन करून भासांची 13 नाटके ‘त्रिवेंद्रम प्लेज’ ह्या नावाने प्रकशित केली। त्यामुळे जगभर भासांचे साहित्य प्रसिद्ध झाले।1

असे असले तरीसुद्धा भासांचा कालखंड, जन्मस्थळ, कर्मभूमी या विषयी अत्यंत कमी माहिती उपलब्ध आहे व तो अनेक आभ्यासाकांमध्ये वादाचा मुद्दा असल्याचे दिसून येते।

महाकवी कालिदासाने त्यांना आपल्या ‘मालविकाग्निमित्र’ या नाटकाच्या प्रस्तावनेत अत्यंत आदराचे स्थान देत प्रतिथयश असे संबोधले आहे। तसेच कवी राजशेखर ह्यांनी भासांच्या ‘स्वप्नवासवदत्त’ ह्या नाटकाचा गुणगौरव केलेला आहे। कवी बाणभट्ट यांनी भासांचे नाटक सूत्रधाराकडून सुरु होते, असा उल्लेख केलेला आहे। याशिवाय ह्या महाकवी चा उल्लेख अभिनवगुप्त, साहित्यकार दंडी, आचार्य जयदेव ह्या महान आचार्याने सुध्दा केलेला आहे।2 तसेच आजच्या युगातील महान दिग्दर्शक रतन थियाम, वामन केंद्रे, कावालाम नारायण पन्नीकर, हबिब तनवीर, ह्यांनी भासांच्या नाटकाचा आदर करून त्यांची नाटके रंगमंचावर प्रस्तुत केलीली आहेत।

शब्द–ब्रह्म
E ISSN 2320 – 0871
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
17 सितम्बर 2018
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

भासांचा कालखंड हा बुध्दकालीन कालखंडाच्या जवळपास जो त्यांच्या नाटकाच्या अध्ययनावरून तसेच त्यातील सामाजिक आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केल्यावर आणि इतर नाटककारांनी केलेल्या गौरवा वरून, ते अभ्यासा अंती इ।स।पूर्व 400 च्या जवळपास च्या कालखंडात पडतात। या बाबतीत प्रा.पुसाळकर, प्रा.कीथ, यांनी सुध्दा त्याला दुजोरा दिलेला आहे।3

भासांनी एकूण किती नाटक लिहिले हे अद्याप स्पष्ट नाही। परंतु त्यांच्या काही नाटकाचा उल्लेख तद्नंतर च्या संस्कृत नाटककारांनी केलेले आहे। ज्यामध्ये 'स्वप्नवासवदत्त' हे नाटक प्रामुख्याने आढळते। त्यापुढे जाऊन शुद्रकाचे 'मृच्छकटीकहे नाटक भासांच्या 'चारुदत्त' ह्या नाटकाशी अनेक बाबींशी मिळते-जुळते आहे। त्यामुळे शुद्रकाने भासांच्या नाटकाची उचल तर केली नाही अशी शंका येणे लाजमी ठरते, परंतु गणपती शास्त्री ने प्रकाशित केलेली 13 नाटके। हेच भासांची नाट्य कृती आहे। असे बहुतांश मत असल्यामुळे त्याच्या तेरा नाटकांचा उल्लेख मिळतो।

भासाची हि तेरा नाटके विविध कथाबिज घेऊन फुलवलेली आहेत,शिवाय त्यात विषयाची विविधता असल्याचे आपणास दिसून पडते।4

1 उदयनकथेवर आधारित नाटक : 'स्वप्नवासवदत्त', 'प्रतिज्ञा-योगान्धारायण'

2 अख्यायीकावर आधारित नाटके : 'अविमारक', 'चारुदत्त'

3 रामायणावर आधारित नाटके : 'प्रतिमा' व 'अभिषेक'

4 महाभारतावर आधारित नाटके : 'पंचरात्र', 'मध्यम-व्यायोग', 'दुतावाक्य', 'दूत-घटोत्कच','कर्ण-भार', 'उरुभंग'

5 कृष्ण-कथेवर आधारित : 'बालचरित'5

भासांच्या ह्या वरील सर्व नाटकापैकी उद्यन कथेवर आधारित नाटके ज्या मध्ये 'स्वप्नवासवदत्त' व 'प्रतिज्ञा-योगान्धारायण' हि नाटके खऱ्या अर्थाने इतिहासिक मानायला हव्या कारण त्या मध्ये राजा उद्यन व राजा प्रद्योत हे पात्र इतिहासातील बौध्द ग्रंथात व पुराणात आपणास पहावयास मिळते।

## भासांची नाट्यशैली व त्यांची लेखन विशेषता

1 सूत्रधार पासून नाटकाची सुरुवात - भासांच्या अनेक नाटकात नाटकाची सुरुवात हि सूत्रधार पासून होते।

2 भरतवाक्य - भासांच्या नाटकात एकाच पध्दतीच्या भरत वाक्याचा उपयोग होताना दिसतो, ज्या मध्ये 'राजसिंह' या राजाचा उलेख मिळतो।

4 नामौल्लेख केलेला नाही - भासांनी 13 हि नाटकात कुठेही नामौल्लेख केलेला नाही।

5 वैशिष्टपूर्ण नांदी(मंगलाचरण)-भासकृत मंगलाचरण म्हणजे नाटकाचा छोटा आलेखच होता।

6 पात्रांचे उद्दातीकरण - कर्ण, कैकयी, दुर्योधन, कंस या सारखे महाभारतातील खलनायक यांच्या हृदयातील मानवी ओल्याव्याचे चित्रण भासांनी आपल्या लेखणीतून प्रगट केले।

7 ब्राह्मणाविषयी आदर व विष्णू भक्ती - ब्राह्मणाविषयी आदर व विष्णू भक्ती हे त्यांच्या तेराही नाटकात प्रकर्षाने जाणवते।6

## भासांची नाट्य शोकांतिका - उरुभंगम

भासांच्या लेखणीतून साकार झालेली संस्कृत नाट्य-वाङ्मयातील पहिली शोकांतिका तसेच भारतीय संस्कृत साहित्यातील सर्व प्रथम शोकांतिका म्हणजे 'उरुभंगम' होय।

महाभारताच्या एकूण 18 पर्वा-पैकी, महाभारताच्या युद्धाच्या शेवटच्या भागाचे अर्थात शल्य पर्वातील हे कथानक आहे। महाभारतात गदा युद्धाच्या वेळी दुर्योधन हा आपल्या विद्येचा वापर करून एका जलाशयात लपून बसतो, त्याला युद्धाचा परिणाम व त्याची एकूण प्रचीती चांगलीच समजलेली असते, पांडव बंधू हे त्या जलाशया जवळ येऊन दुर्योधनाची निंदा करतात। दुर्योधनाला हे सगळे सहन होत नाही, तेंव्हा तो बाहेर येतो व पांडवा पैकी भीमसेन याला गदा युद्धाचे आव्हान देतो।

दुर्योधनाशी युध्द करणे हे पांडवाला अत्यंत कठीण जाते। तेसेच दुर्योधन हा भीमा पेक्षा युद्वात सरस ठरत असतो। अश्या वेळी कृष्ण आपल्या मांडीवर थाप मारून अप्रत्यक्ष रित्या भीमाला दुर्योधनाच्या मांडीवर प्रहार करायला सांगतो, त्याचे संकेत ओळखून भीम दुर्योधनाची मांडी छन्नविछीन्न करतो म्हणजेच दुर्योधनाचा 'उरुभंग' होतो व दुर्योधन गात प्राण होतो। महाभारत या महाकाव्यात एवढेच नमूद आहे।

द्रोपदी चे वस्त्र हरण झाल्यामुळे पांडवा मध्ये असलेला क्रोध व त्यामुळे चिडलेला भीमसेन व युद्वात सर्व भावांचा मृत्यू झाल्यामुळे संतप्त झालेला दुर्योधन यांचे गदायुध्दा भासानी अत्यंत सुंदरतेणे, तसेच प्रभावीपणे या नाटकातून मांडलेले आहे।

महाभारतावरील या कथानकाला आपल्या प्रतिभावान लेखणीतून मूळ कथानकाला व त्याच्या आंतरिक गाभ्याला कुठेही जास्त बदल न करता व त्याचा आशय शाबित ठेऊन। थोड्याबहुत लेखन स्वतंत्रता याचा आधारघेऊन भासांनी उरुभंगम हे नाटक रचले।

प्रारंभी विष्कंभक या मध्ये तीन सैनिक युध्द भूमीवरील भयावह परिस्थिती चे विश्लेषण करून सांगत आहेत। युध्द भूमीवर सैनिक, घोडे, हत्ती यांच्या प्रेताचा खच पडलेला आहे। रक्ताचे जणू पाट-वाहताना दिसत आहे, त्यामुळे हे युध्द अत्यंत रक्त-रंजीत झालेले आहे। रिकामे हत्ती सैर-वैरा भटकताना दिसत आहे, रिकामे रथ घेऊन घोडे त्याला ओढत चालले आहे। मग भीमसेन व दुर्योधनाचे प्रत्यक्ष गदा-युध्द सुरु होते। ते एकमेकांवर गदेचे तीव्र प्रहार करून युद्वास गती देत आहे।

चपळ दुर्योधनाच्या प्रहाराने भीमाचे मस्तक रक्त बंबाळ झाले आहे व कपाळावरून रक्त वाहू लागले आहे। त्याचे दोन्ही खांदे फुटून छाती रक्ताने माखलेली आहे। तरबेज असा दुर्योधनासमोर भीमाच्या शक्तीचा कस लागत आहे। दुर्योधनाच्या मार्याने भीम जमिनीवर कोसळला हे पाहून व्यास मुनी ,विदुर,अर्जुन व कृष्ण हे सर्व चिंतामग्न झालेले दिसत आहेत। याउलट बलराम मात्र खुश होऊन दुर्योधनावर खुश झालेला आहे।

दुर्योधन खाली पडलेल्या भीमा ला हिनवू लागला तेंव्हा कृशाने आपल्या कुत नीतीचा वापर करून आपल्याच मांडीवर थाप मारली व भीमाला दुर्योधनाच्या मांडीवर प्रहर करण्याचे संकेत केले। भीम आपले बळ एकवटून पुन्हा युइध्दस सज्ज झाला, गदा-युद्धाचे सर्व नियम झुगारून भीमाने तीव्र प्रहार दुर्योधनाच्या मांडीवर केला यात दुर्योधन खाली कोसळला। व हे दृश्य पाहताच बलराम क्रोधाने लाल बुंद झाला। कृष्णाने भीमाला संरक्षक कवच देऊन त्याला युध्द भूमीच्या दूर नेले येथे विष्कंभक संपते।

नाटकाच्या मुख्य उत्तरार्ध यात क्रोध अनावर झालेला बलराम प्रवेश करतो, उरुभंग झालेल्या मांड्याघेऊन दुर्योधन सरपटत रंगमचावर प्रवेश करतो व बलरामाला शांत करण्याचा प्रयत्न करतो। मृत्यू समयी दुर्योधनाची वृत्तीआता शांत झालेली आहे। कारण सर्व भावाचा युद्वात मृत्यू झाल्यावर व स्वतःची अशी दशा झाल्यावर त्याला सूड-घेण्याची भावना रुचत नाही आहे। भीमा च्या गदा रुपात साक्षात विष्णू ने आपला नाश केला व युद्वाची इच्छा करणार्या मला यमाच्या भेटीला पाठवले या नंतर कुरुराज धृतराष्ट्र व मत गांधारी दुर्योधांच्या सर्व स्त्रिया व त्याचा लहान मुलगा दुर्जय त्या ठिकाणी प्रवेश करतो।

तेंव्हाच करुण प्रसंग म्हणजे भासांच्या लेखणीचा व त्यांचा प्रतिभेचा खर्‍या अर्थाने मान बिंदू आहे व भासांचे कौशल्य दुर्योधनाच्या मानवी भावनेने केलेले प्रगटीकरण हे भासांचे कौशल्य दर्शविते। दुर्योधन हा कुरुराज धृतराष्ट्र यांना उठून वंदन करू लागला असता, भग्न झालेल्या मांड्यामुळे तो खाली कोसळतो व त्याची हि अवस्था पाहून शोक वेगाने धृतराष्ट्र विव्हळून खाली कोसळतो।तेंव्हा तो आपल्या पित्याला समजावून सांगतो कि,ह्या रणांगणात लढताना मला क्षत्रियाचे वीर मरण आलेले आहे। त्यामुळे क्षत्रियाचे धर्म पाचारण करूनच मी मृत्यू समोर

गेलो तरी तुम्ही शोककुळ होऊ नका असा तो आगतिक रित्या सांगतो।

नंतर माता गांधारी हिला म्हणतो कि, “माते मला जर माझ्या पुण्यकर्मातून मला पुनर्जन्म मिळाला तर पुढील जन्मात देखील तू माझीच आई हो”!

या नंतर अश्वत्थामा बातमी मिळताच तो तिथे पोहोचतो आणि दुर्योधन याची अवस्था पाहून तो संतापतो, आणि कृष्ण व पांडवाचा विनाश करण्याची शपथ घेतो।

अंत समय येताच त्यांनी केलेले पाप त्याच्या डोळ्या समोर आठवू लागते व त्याला आपल्या कृत्याचा पश्चाताप येतो। अश्वत्थामा हा दुर्जयला जवळ घेतो, व ‘तू आमचा अभिषेका वाचून राजा आहेस’ असे म्हणतो हे ऐकून दुर्योधनाला बरे वाटते व तो निश्चल पणे श्वास सोडतो।

अश्वत्थामा पांडवाचा नाश करायला निघतो, धृतराष्ट्र राज्यसोडून वनात निघून जाण्याचा निर्णय घेतात, व याच ठिकाणी एकांकिका समाप्त होते।7

भासाने या एकांकिकेला दिलेल्या प्रतिभा संपन्नतेच्या कलाटन्या या प्रसंशनिय आहे। महाभारतातील धूर्त व कपट निती व कुटील कारस्थान करणारा खलनायक भारतीय, पौराणिक महाकाव्यात खलपुरूष ठरलेला दुर्योधन, भासांनी आपल्या लेखन तंत्राच्या जोरावर या कथेचा नायक करून टाकला आहे। या शिवाय महाभारताचा कथानकात जे पात्र दुर्योधनाच्या मृत्यू समयी उपस्थित नव्हते जसे धृतराष्ट्र गांधारी, दुर्योधनाच्या स्त्रिया व लहान मुलगा दुर्जय ह्यांना उपस्थित करून नाटकाला नवीन दिशा देण्याचे काम भासानी केले व ह्यामुळे ह्या कथानकात भावनिक उत्थान व कारुणिक मनस्थिती निर्माण झाली। भासाने महाभारतातील दुर्योधनाचा जलाशयात लपून बसल्याचा प्रसंग या एकांकिकेत घेतला नाही कारण भासला दुर्योधनाचे नवे रूप दाखवण्यात नक्कीच बाधा निर्माण झाली असती। तसेच त्याचे नवे मानवी स्वरूप व एक हृद्य स्पर्शी व्यक्तिचित्रण घडवण्यास भासाने आपल्या लेखन स्वतंत्र तेचा उत्कृष्ठ नमुना प्रस्तुत केला, कारण जेंव्हा महाभारतातील दुर्योधन मरण पावतो तेंव्हा लोक त्यांच्या मरणावर उत्सव करतात हेच महाभारताचे सत्य आहे। परंतु या एकांकिकेचा नायक दुर्योधन मरताना मात्र प्रेक्षक, नाट्य-वाचक यांच्या हृदयाचा बांध-फुटून त्यांच्या डोळ्यात अश्रू आल्या शिवाय राहत नाही, जो कृष्ण आंपण भगवान म्हणून मानतो एका क्षणाला त्याचा विषयी राग निर्माण होतो व त्याच्या छळ व कपट वृत्तीचा सुद्धा क्रोध निर्माण होतो।

भासानी दुर्योधनाचे जे पात्र रंगवले आहे त्यात तो फक्त ह्या एकांकिकेचा मुख्य पात्राच नाही तर खऱ्या अर्थाने तो आदर्शवादी व प्रामाणिक नायक आहे।कारण नाटकात मृत्यूसमयी कपटाने भीमाने कृष्णाच्या सांगण्यावरून दुर्योधनाचा केलेला घात हा क्रोध उत्पन्न करणारा आहे, तरी सुध्दा नाटकात मृत्यू समयी दुर्योधनाचा मनात थोडाही क्रोध नाही याउलट तो वैर भाव विसरून, माझी मृत्यू हि विष्णूची इच्छा आहे त्यामुळे भीम व कृष्ण यावर क्रोधीत होण्याचे कारण नाही असे तो म्हणतो।

या मध्ये भासानी दुर्योधनाला एक कुशल योद्धा,एक धर्मनिष्ठ व्यक्ती त्या शिवाय एक प्रामाणिक पती तसेच वडिलांचा आदर करणारा एक उत्कृष्ट पुत्र, आईच्या ऋणात राहून तिची सेवा करण्यासाठी पुनर्जन्म घेणारा एक मुलगा व एक कर्तव्य दक्ष तसेच मुलांची चोख काळजी घेणारा एक पिता असा सत पुरुष म्हणजे दुर्योधन असा व्यक्ती डोळ्या समोर भासांच्या लेखणीतून उभा राहतो। या बहुआयामी व्यक्ती चित्रणामुळे तो या नाटकाचा नायक म्हणून उभा राहतो। गदायुद्धात तरबेज व निपुण असल्यावरही भीम कृष्णाच्या सांगण्यावरून कपट नीतीने दुर्योधनाच्या मांड्या भग्न करतो, हे अर्थात त्याचे उरुभंग करतो म्हणून ‘उरुभंग’ शिर्षक अत्यंत योग्य व कथेस अनुरूप व त्यास न्याय देणारे आहे।8

भासानी महाभारतातील हि कथा फक्त सुधारित केलेली नाही उलट यापुढे जाऊन त्यातील

शब्द–ब्रह्म
भारतीय भाषाओं की अंतर्राष्ट्रीय मासिक शोध पत्रिका
E ISSN 2320 – 0871
17 सितम्बर 2018
पीअर रीव्यूड रेफ्रीड रिसर्च जर्नल

उल्लेखनीय गुणाचे उद्घाटनपण केले यामुळे पौराणिक पात्राचे गुणधर्म नव्या पद्धतीने मांडले। म्हणून भासांची नाट्य-रचना हि अनेक वेगवेगळ्या विषयाला हात घालून रंगमंचावर प्रयोगात्माकता आणणारी असतेच यात काहीच वाद नाही। जर जागतिक परिस्थितीचा आढावा घेतला तर ग्रीक मधील शोकांतिका नाटके हि खऱ्या अर्थाने नाटकांची व शोकनाट्यांची गंगोत्री आहे। ईसा.पूर्व 500 ते 400 च्या जवळपास तिथे शोकनाट्यांचा जन्म झाला, हे जग मान्य इतिहासिक सत्य आहे। 'अरीस्टॉटल' ह्या विश्वविख्यात ग्रिक विचारवंताने 'पोएटिक' या ग्रंथात शोकांतिकेचे तत्व व वैशिष्टे मांडले। तो शोकांतिकेची व्याख्या खालील प्रमाणे करतो।9

"शोकरसात्मिका हि मानवी कृत्यांची प्रतिकृती होय, हे कृत्य (action) गंभीर स्वरूपाचे, स्वयंपूर्ण व विशिष्ट मर्यादेत समाविष्ट असावे। भाषा व नाट्याच्या विविध भागात ताल बद्धता गेयता वैगरे अलंकृत असावी। मानवी कर्माच्या नात्यातील प्रतिकृतीत करुणा व भय यांचा समवेश असून त्याचे उचित 'रेचन' आखरीस साधले जावे।" त्यांनी त्यासाठी शोकनाट्याचे सहा प्रभावी अंग सांगितले

1 कथानक 2 स्वभावदर्शन 3 विचार 4 भाषा 5 गित-संगीत 6 दृश्ये10

हे अंग सांगून प्रथम कथानकाला व स्वभाव दर्शनास जास्त महत्व दिलेले आढळून येते।

1 कथानक हे गुंतागुंतीचे असावे ह्यात घटनेची गुंफण असावि शिवाय कथानका मधून सत्य किवा याचे आकस्मित झालेले यथार्थ वर्णन असावे।

2 नाटकाच्या नायकाचे वर्णन हे वैभवाच्या शिखरावरून तो आपत्तीच्या व शोकामध्ये गुरफटून गेला पाहिजे, तसेच नायक हा थोर,गुणवान व निपुण असा दाखवावा।

3 नायकाच्या स्वभावातील एका दोषामुळे किंवा त्रुटीमुळे त्याची अधोगामी झाली असे दाखवावे।

4 पात्राचे विचार हे पात्राच्या स्वभावाशी मिळते जुळते असावे।

5 कथकच्या संबंधित गीत असावे।

6 अंतिम परिणामात करुणा व भयचकिकता याचे विरेचन व्हावे।

7 यामध्ये योगा-योग व दैवी-यंत्रणा घटना दाखवू नये।

8 नायकाच्या दुर्गुणामुळे किंवा दुराचारामुळे भाग्य फिरले असे दाखवू नये।

ह्या शोकांतिकेच्या प्रमुख बाजू 'अरीस्टॉटल' यांनी प्रथमच सैद्धांतिक स्वरुपात मांडल्या। जर आपण ह्या सर्व नियमाला 'उरुभंग' ह्या नाटकाशी जुळवून व तुलनाकरून पहिली तर जो कोणी नाटकाचा प्रेक्षक महाभारताच्या कथेवरून पूर्वग्रह दुषित नसेल तर दुर्योधन हा शोकांतिकेचा नायक ठरतो व भिम व कृष्ण हा खलनायक ठरतो हे मान्य करावेच लागेल कारण हि भासांच्या लेखनीचीच प्रतिभा आहे कित्यांनी दुर्योधनाला एक उदार,आदर्शवादी,नायक बनवलं व त्याच्या कोणताही दुर्गुण बाहेर न आणता दुसर्याच्या कपात नीतीमुळे त्याचा बळी जातो व प्रेक्षकांचे हृद्य पिळवटून निघते व प्रेक्षकांचे करून व भय ह्या दोन रसांचे विरेचन होते।

## निष्कर्ष

भासांचे 'उरुभंग' नाटक पूर्वग्रह दुषित न ठेवलेल्या प्रत्येक प्रेक्षकांसाठी एक शोकांतिकाच आहे आणि शोकनाट्याचे जास्तीत जास्त नियमाला हे अनुसरून असल्यामुळे हि संस्कृत नाट्यपरंपरेचे पहिले शोकनाट्य आहे।

## सन्दर्भ ग्रन्थ

*1 भास के नाटक (खंड1) पृष्ठ 7*
*2 संस्कृत नाट्य वाड्मयाचा इतिहास, पृष्ठ 409*
*3 संस्कृत नाट्य वाड्मयाचा इतिहास, पृष्ठ 51*
*4 भास कि भाषा संबंधी तथा नाटकीय विशेषता, पृष्ठ*
*5 भास के नाटक (खंड 1) पृष्ठ xi*
*6 भासा-ए-स्टडी, पृष्ठ 7*
*7 भास एक प्रयोगशील नाटककार, पृष्ठ 80*
*8 Bhasa Urubhangam and Indian Poetics*
*9 Aristotle and The elements of tragedy / - URL:- http://nisd /net>pdf>summer_reading*
*10 युरीपिडीज ची शोक नाट्य (प्रस्तावना) पृष्ठ 4*